**पीएम श्री शाळा योजनेंतर्गत एकूण ५६५१ विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा अनुज्ञेय करण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०२४/प्र.क्र.०६/एसडी-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २३ जानेवारी, २०२४

**वाचा:-**

१) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/एसडी-६, दि.०२.०३.२०२३.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र क्र.मप्राशिप/समग्र शिक्षा/वाहतूक सुविधा/नस्ती क्र.२४/२०२३-२४/१७४, दि.१६.०१.२०२४

**प्रस्तावना :-**

या विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दि.०२.०३.२०२३ च्या शासन निर्णयान्वये पीएम श्री शाळा या केंद्र पुरस्कृत योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत निवड झालेल्या शाळांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची आदर्श स्वरुपात अंमलबजावणी करावयाची आहे. सदर योजना प्रामुख्याने ६ स्तंभांवर आधारित असून त्यापैकी प्रवेश आणि पायाभूत सुविधा हा महत्वाचा स्तंभ आहे. केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने पीएम श्री शाळा योजने संदर्भात प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक पुस्तिका-भाग २- Implementation and Programmatic Guidelines अन्वये पीएम श्री शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वाहतूक/मदतनीस सुविधा अनुज्ञेय करण्यात आली आहे. सद्यस्थितीत राज्यात या योजनेचा पहिला टप्पा राबविण्यात येत असून त्यात एकूण ५१६ शाळांचा समावेश आहे.

पीएम श्री शाळा योजनेंतर्गत वाहतूक/मदतनीस सुविधेचा लाभ घेणाऱ्या इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यास प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रु.६,०००/- इतकी रक्कम अनुज्ञेय आहे. सन २०२४-२५ करीता १ कि.मी., ३ कि.मी., ५ कि.मी. अंतरावरून येणाऱ्या ५६५१ विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ घेण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे.

**शासन निर्णय:-**

या शासन निर्णयासोबत जोडलेल्या Annexure-A मधील प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील ३९२८, Annexure-B मधील माध्यमिक स्तरावरील ८०४ व Annexure-C उच्च माध्यमिक स्तरावरील ९१९ अशा एकूण ५६५१ विद्यार्थ्यांना पीएम श्री शाळा योजनेंतर्गत सन २०२४-२५ करीता वाहतूक/मदतनीस सुविधेचा लाभ अनुज्ञेय करण्यासाठी पात्र ठरविण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. विद्यार्थ्यांची आधार नोंदणी व वैधता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून सदर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. मंजूरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याने पीएम श्री शाळा योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्तावांतर्गत विद्यार्थी सदर लाभ घेण्यास पात्र आहेत, याची खात्री करावी.

४. या शासन निर्णयामुळे कोणतीही शाळा बंद केली जाणार नाही.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०१२३१५३२३०४०२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHARAD SHRIPATRAO MAKNE

Digitally signed by SHARAD SHRIPATRAO MAKNE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=40009b0c8c256bdd08326d4d03bc30fb4de2adcc1f32bbb9e402266a2b8f7a5a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1B4D811632BD3D04BCA0618EEF09D95DD93FF5D37934DF32703629ABD10E555A, cn=SHARAD SHRIPATRAO MAKNE
Date: 2024.01.23 15:36:16 +05'30'

(शरद माकणे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. माराज्यपाल यांचे प्रधान सचिव ., राजभवन, मुंबई,
२. मामुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव ., मंत्रालय, मुंबई,
३. मा उपमुख्यमंत्री .(वित्त)/(गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुंबई ,विधानभवन ,विधानसभा ,अध्यक्ष.मा / विधानपरिषद ,सभापती.
५. मा.मुंबई ,विधान परिषद/विधानसभा ,विरोधी पक्ष नेता.
६. मा.मुंबई ,मंत्रालय ,यांचे खाजगी सचिव (शालेय शिक्षण) मंत्री.
७. मा (सर्व) मंत्री.यांचे यांचे खाजगी सचिव.मुंबई ,मंत्रालय ,
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य.पुणे ,
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. संचालकपुणे ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संचालनालय ,
११. राज्य प्रकल्प संचालक,मुंबई ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ,
१२. जिल्हाधिकारी सर्व,
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सर्व ,
१४. शिक्षण संचालक ( प्राथमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. शिक्षण संचालक ( माध्यमिक-माध्यमिक व उच्च ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, राज्य, पुणे,
१६. शिक्षण संचालक (योजना), पुणे
१७. संचालकपाठ्यप ,महाराष्ट्र राज्य ,ुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ(बालभारती), पुणे,
१८. अध्यक्ष,पुणे ,राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
१९. सहसंचालक,(प्रशासन(, शिक्षण आयुक्तालयपुणे ,
२०. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२१. शिक्षण सहायक संचालक(सर्व)
२२. गटविकास अधिकारी (पंचायत समिती)(सर्व)
२३. मुख्याधिकारी, नगरपालिका, सर्व
२४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना), जिल्हा परिषद (सर्व)
२५. गटशिक्षणाधिकारी (सर्व)
२६. विस्तार अधिकारी (शिक्षण)(सर्व)
२७. उपशिक्षणाधिकारी (सर्व)
२८. शिक्षण निरीक्षक (सर्व)
२९. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
३०. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका(सर्व)
३१. निवड नस्ती (कार्यासन-एसडी-६).